वि.दि.दावा.क्र. १५४/२०२३
मंदाबाई वि. रामराव
निशाणी क्र. १११

प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.१ मोहन रामराव तायवाडे -
मी शपथेवर सांगतो की,

साक्षीदाराचा सर तपास प्रतिवादी क्र. १, २, ८ आणि ९ तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. पालीवाल यांच्यातर्फे सुरु-

माझ्या शपथपत्रातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो मला वाचुन दाखविण्यात आला आणि मराठी भाषेत समजावुन सांगण्यात आला. त्यावर माझी सही आहे.

२. मी माझ्या पुराव्याकामी, इंडेक्स-२, अधिकार अभिलेख आणि डे-बुक प्रत दाखल केलेली आहे. सर्व कागदपत्रे हे प्रामाणीत प्रती आहेत. बक्षिस पत्राची मुळ प्रत दाखल केलेली आहे. सदर दस्तांना अनुक्रमांक नि.क्र.११२ ते ११५ देण्यात येत आहे. मी दाखल केलेल्या कागदपत्रातील मजकुर खरा व बरोबर आहे.
सरतपास पुर्ण.

साक्षीदाराचा उलटतपास वादीतर्फे त्यांचे सुविद्य विधीज्ञ श्री. प्रविण बी. अवचट यांक्षरे -

३. प्रतिवादी क्र.१ रामराव हे माझे वडील आहेत. वादी ही माझी सख्खी बहिण आहे. वादी ही घरातील थोरली आहे. रंगराव ठाकरे हे माझे भाउजी आहेत. रंगराव हे मंदाबाईचे पती आहेत. माझ्या बहिणीचे लग्न सन १९७२ साली झाले. त्यावेळेस माझे वय हे १ वर्षांचे होते. हे मला आठवत नाही की सन १९८२ साली केवलराम हे आठवीमध्ये होते. हे म्हणणे खरे नाही की केवलराम हे मंदाबाईजवळ शिक्षणासाठी होते. हे म्हणणे खरे नाही की सात वर्षे केवलराम मंदाबाईकडे राहिले. हे म्हणणे खरे नाही की, हंसराजच्या जन्माच्या वेळी सरस्वतीबाई हिची डिलीवरी, मंदाबाईच्या घरी झाली. हे म्हणणे खरे नाही की मंदाबाईला घरातील सर्व बाबींचे, जमिनीबाबतची सर्व माहिती होती. हे म्हणणे खरे नाही की, रंगराव यांना देखिल घरातील सर्व बाबींची माहिती होती. हे म्हणणे खरे आहे आमचा उदरनिर्वाह हा शेतीवरच अवलंबुन होता. माझा आणि माझ्या वडीलांचा उदरनिर्वाह देखिल शेतीवर अवलंबुन होता. हे म्हणणे खरे नाही की दावामिळकत ही वडीलोपार्जित आहे. हे म्हणणे खरे नाही की शेतजमिन ही सदाशिव यांच्याकडुन आलेली होती. मी माझ्या जन्मापासुन खंडाळा येथे राहत होतो. हे म्हणणे खरे आहे की खंडाळा येथील घराचा नंबर ११९ असा आहे. हे म्हणणे खरे नाही की घर क्र.११९ हे वडीलोपार्जित आहे. हे म्हणणे खरे नाही की सदर घरामध्ये माझ्या जन्माच्या अगोदर पासुन सर्व लोक एकत्र राहत होते. हे म्हणणे खरे नाही की हरिभाउ आणि रामराव यांच्यामध्ये

आपसी वाटणीपत्र झाले होते. हे म्हणणे खरे नाही की वाटणीनुसार माझ्या वडीलांच्या हिस्स्याला खसरा क्र. ३८, ८२, १११ आणि ४३ आले होते. साक्षीदाराला बंदोबस्त नकाशा दाखविण्यात आला, साक्षीदाराने सांगितले की चुक आहे. हे म्हणणे खरे नाही की बंदोबस्त नकाशाप्रमाणे माझ्या वडीलांच्या हिस्स्याला आलेल्या जमिनींचे खसरे क्रमांक हे नविन झालेले आहेत.

४. माझ्या वडीलांनी जमिन कधी खरेदी केली होती हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की सन २०१३ मध्ये माझ्या वडीलांना किडनी स्टोनचा आजार झाला होता. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळेस मी, मी स्वतः भिमराव कडु यांना घेवुन, माझ्या वडीलांना मंदाबाईच्या घरी नेले होते. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की हॉस्पीटलमध्ये नेले होते. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळेस माझ्या वडीलांची तब्येत खुप जास्त खराब झाली होती. हे म्हणणे खरे नाही की वडीलांची तब्यत खराब झाल्यानंतर रंगराव यांनी त्यांना पडोळे हॉस्पीटल मध्ये नेवुन त्यांचा उपचार केला आणि त्याचा खर्च त्यांनी केला. हे म्हणणे खरे नाही की मला हर्णीयाचा त्रास झाल्यानंतरही, मला दवाखान्यात नेण्याचा आणि उपचाराचा खर्च मंदाबाईने केला. हे म्हणणे खरे आहे की आई मयत झाल्यानंतर तिच्या चौदावीचा कार्यक्रम हंसराज यांच्या गावी झिंगाबाई टाकळी येथे झाला. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळी माझ्या वडीलाची तब्यत जास्त खालावली होती, त्यावेळी मंदाबाईने त्यांना तिच्या घरी १५ ते २० दिवस ठेवुन त्यांची सेवा केली. प्रतिवादीच्या वकीलांची आक्षेप नोंदविला की सर्व प्रश्न हे अप्रस्तुत आहेत कारण त्याबाबतचे कथन हे दाव्यामध्ये नाही.

५. हे म्हणणे खरे नाही की माझ्या वडीलांनी शेतीच्या उत्पन्नातुन सन १९९६ साली प्लॉट नं. २१ घेतला. हे म्हणणे खरे आहे की कौटुंबीक उत्पन्नातुन रक्कम रु. ८० हजारामध्ये प्लॉट नं. २१ घेण्यात आला होता. प्रतिवादीच्या वकीलाने आक्षेप नोंदविला की दोन प्रश्न एकत्र करुन प्रश्न विचारण्यात आला आहे. हे म्हणणे खरे नाही की सदर प्लॉटवर सन २००० मध्ये बांधकाम करण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की सन २००० पर्यंत आम्ही प्लॉट नं. ११९ मध्ये सर्व एकत्र राहत होतो आणि सर्वांचे लग्न कार्य हे तेथुनच झाले. हे म्हणणे खरे आहे की माझ्या म्हणण्याप्रमाणे खसरा क्र. ८२, ४३, ३८, १११ चे आपसी बटवारे सन २००५ मध्ये झाले आहे. त्याबाबत बैठक घेतली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की बैठकीला बहिणी उपस्थित नव्हत्या. हे म्हणणे खरे नाही की बहिणीची संमती घेतली नाही. आपसी बटवा-याचा दस्त या कामात दाखल केलेला नाही. आपसी बटवा-याचा लेखी दस्त केला नाही. आपसी बटवारा झाला नाही, जमिन ही नावे करुन दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या वडीलांनी कोणताही बटवारा करुन दिलेला नाही आणि तलाठयाला हाताशी धरुन आम्ही सदर नावे लावलेली आहेत.

६.        हे म्हणणे खरे नाही की खसरा क्र. ३७/२ हे माझ्या वडीलांनी, माझ्या मोठा भाउ केवळराम याल शेतीच्या उत्पन्नातुन घेवुन दिली. मी १९९२-९३ साली शाळेमध्ये शिक्षण घेत होतो. हे म्हणणे खरे नाही की शेती मी आणि माझे वडील करत होतो आणि त्याचे उत्पन्न आम्हीच घेत होतो. हे म्हणणे खरे नाही की माझ्या वडीलांना बसिक्ष पत्र करण्याचा अधिकार नव्हता.

वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI

L.A.R. No. 106-2005
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2026.02.13 17:03:32 +0530

दिनांक १२.०२.२०२६.
रामटेक

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : R. J. khobragade (Gr.-II)